SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX-2690571, 293730 GRAM : UNISHIVAJI
FAX : ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३ Affi. Ext. १०८९, १०९०
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४.
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६९०५७१ (विस्तारीत क्रमांक - १०८९, १०९०)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.

★★★★★ B+
Accredited By
NAAC

संलग्नता/टे.१/एमएके/66 12 JUL 2007

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था

विषय : स्थानिक निवड समिती मार्फत शिक्षक निवडीचे प्रस्ताव विद्यापीठास पाठवून शिक्षक मान्यता घेण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे निवड प्रक्रिया असावी.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, महाविद्यालयामध्ये काही वेळा स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षकांच्या नेमणूका केल्या जातात. स्थानिक निवड समितीमार्फत निवड प्रक्रिया करताना कोणत्या बाबी विचारात घ्याव्यात यासाठी यापूर्वी विद्यापीठाच्या क्र. संलग्नता/जन/११७०० दि. १४/०३/२००५ च्या पत्राने सर्व संलग्न महाविद्यालयांना नियमावली पाठविली आहे. परंतु विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही महाविद्यालये स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षक निवड प्रक्रिया होत असताना या नियमावलीमध्ये दिलेल्या नियमांचे पालन करीत नाहीत. तसेच स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षक निवडीच्या बैठकीचे प्रस्ताव विद्यापीठाला उशिरा प्राप्त होतात. त्यामुळे काही तांत्रिक अडचणी निर्माण होतात. यावर उपाययोजना करण्यासाठी नेमलेल्या समितीने तयार केलेली नियमावली विद्यापीठ अधिकार मंडळाने दि. १८/०६/२००७ रोजीच्या बैठकीत मान्य केली आहे, ती सोबत पाठवित आहे.

तेंव्हा येथून पुढे सदर नियमावली नुसारच स्थानिक निवड समिती प्रस्ताव विद्यापीठास पाठविण्याची कार्यवाही करावी. अन्यथा प्रस्ताव मान्यतेबाबत विलंब झाल्यास सर्वस्वी संबधित महाविद्यालय/संस्था जबाबदार राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

## स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षक निवड प्रक्रियेबाबत मार्गदर्शक सूचना

१ स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षक निवडीसाठी महाविद्यालयाने दि.३० एप्रिल पूर्वी विद्यापीठाकडे विषयवार कार्यभार कळविणे आवश्यक आहे.

२ महाविद्यालयाकडून पदमान्यतेसाठी विषयवार कार्यभार प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाने २० मे पर्यत पदमान्यता देणे आवश्यक आहे.

३. विद्यापीठाकडून पदमान्यता प्राप्त झालेनंतर पूर्णवेळ पदांच्याबाबत महाविद्यालयाने ०८ जूनपर्यत स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करून स्थानिक निवड समितीची बैठक आयोजित करावी. स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षकांची नियुक्ती करताना जाहिरात मसुदा विद्यापीठाकडून मान्य करून घेण्याची आवश्यकता नाही. मात्र पूर्णवेळ पदांच्याबाबत नियमित पदांच्या बिंदू नामावलीमधील आरक्षणाचे बिंदू विचारात घ्यावेत. व त्याला अनुसरुनच जाहीरात प्रसिध्द करावी.

४. काही विषयांसाठी अर्हताप्राप्त उमेदवारांची पुरेशी संख्या उपलब्ध होत नसल्याने काही अपरिहार्य परिस्थितीमध्ये एकाच उमेदवाराची पुढील शैक्षणिक वर्षासाठी स्थानिक निवड समितीमार्फत निवड करता येईल.

५. काही महाविद्यालयांमध्ये काही विषयांचा कार्यभार उदा. संख्याशास्त्र, पर्यावरण अभ्यास इ. कायमस्वरूपी कार्यभार हा ४ ते ११ तासांचा असतो. अशी पदे कार्यभाराअभावी पूर्णवेळ होऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांना विद्यापीठ निवड समितीमार्फत अर्हताप्राप्त कायमस्वरूपी उमेदवार उपलब्ध होत नाहीत. अशा विषयासांठी एकाच उमेदवारांची पुढील शैक्षणिक वर्षासाठी स्थानिक निवड समितीमार्फत निवड करता येईल.

६. स्थानिक निवड समितीच्या बैठकीनंतर महाविद्यालयाने दोन दिवसांत स्थानिक निवड समितीचे अहवाल शिक्षक मान्यतेसाठी विद्यापीठामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

७. निवड समितीचा/चे अहवाल सोबत दिलेल्या विहित नमुन्यात सादर करावा/करावेत. अहवालावर निवड समिती सदस्यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

८. अहवालासोबत फॉर्म "अ" मध्ये जाहिरातीस अनुसरून अधिव्याख्याता पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची सर्व तपशीलासह माहिती दयावी.

९. फॉर्म "ब" मध्ये शिफारस केलेल्या उमेदवाराची माहिती भरून त्यावर संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

१०. अहवालासोबत शिफारस केलेल्या उमेदवारांचे पदवी, पदव्युत्तर पदवी, एम.फिल., पीएच.डी., नेट/सेट परीक्षा प्रमाणपत्र व पूर्ण वेळ पदाच्या बाबतीत जाहिरातीची छायांकित प्रत, विद्यापीठ पद मान्यतेची साक्षांकित प्रत जोडण्यात यावी.

११. विद्यापीठाच्या मान्यतेशिवाय कोणत्याही परिस्थितीत नेमणूका केल्या जाऊ नयेत.

१२. विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतरच शिक्षकांच्या नेमणूका करण्यात याव्यात व शिक्षक महाविद्यालयात हजर होताच त्यांचे चेंजिस-इन-स्टाफ फॉर्म भरून विद्यापीठाकडे त्वरित पाठविणे आवश्यक आहे.

१३. स्थानिक निवड समिती खालीलप्रमाणे राहील.

अ) संस्थेच्या गव्हर्निंग बॉडीचे अध्यक्ष/चेअरमन/ किंवा अध्यक्ष/चेअरमन नियुक्त प्रतिनिधी

ब) महाविद्यालयाचे प्राचार्य/मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेचे संचालक किंवा नवीन महाविद्यालयाच्या/मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थेच्या संदर्भात प्राचार्य/प्र-प्राचार्य/संचालक/प्र-संचालक नसल्याने अध्यक्ष/चेअरमन नियुक्त अन्य महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थेतील प्राचार्य/संचालक/प्र-संचालक (प्राचार्य/प्र-प्राचार्य/संचालक/प्र-संचालक म्हणून विद्यापीठाची मान्यता आवश्यक आहे. मान्यता नसल्यास प्रथम मान्यता घ्यावी. विना मान्यता बैठकीस उपस्थित राहता येणार नाही.)

क) महाविद्यालयातील संबंधित विषयातील विभागप्रमुख किमान १० वर्षे शिकविण्याचा अनुभव असलेले असणे आवश्यक आहे. (विभागप्रमुख नसतील तर अन्य महाविद्यालयातील संबंधित विषयातील ज्येष्ठ विषयतज्ञ घ्यावेत.)

१४. प्राचार्य/संचालक, प्राध्यापक व सहा.प्राध्यापक किंवा तत्सम पदांवर स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षक नेमता येणार नाहीत.

१५. केवळ तळांतील पदांसाठीच अपवादात्मक परिस्थितीत अशा नेमणूका कराव्यात. वरील सर्व बाबींचे पालन करण्यात यावे.

१६. महाविद्यालयाकडून स्थानिक निवड समितीचे अहवाल प्राप्त झालेपासून १५ दिवसांमध्ये विद्यापीठाने योग्य तो निर्णय महाविद्यालयास कळविणे आवश्यक आहे.

१७. शासनाची मान्यता उशिरा आल्यामुळे उशिरा सुरू झालेल्या महाविद्यालयाने स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षक निवडीची प्रक्रिया शासन मान्यता मिळालेपासून दोन महिन्यांमध्ये पूर्ण करून घेणे आवश्यक आहे.

अ) कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास किंवा नव्याने निर्माण झाल्यास पद रिक्त झाल्यापासून दोन महिन्यामध्ये स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षक निवडीची प्रक्रिया महाविद्यालयाने पूर्ण करून घेणे आवश्यक आहे.

१८. स्थानिक निवड समितीचे अहवाल महाविद्यालयाकडून विहित वेळेत सादर न झाल्यास बिगर व्यावसायिक महाविद्यालयांसाठी प्रति पद दरमहा रू.१००/- व व्यावसायिक महाविद्यालयांसाठी प्रति पद दरमहा रू.२००/- विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१९. प्रतिवर्षी त्याच त्याच व्यक्तीला स्थानिक निवड समितीमार्फत नेमणूक देण्याऐवजी पूर्ण वेळ रिक्त पदे तातडीने विद्यापीठ निवड समितीमार्फत भरण्यात यावीत.

-------------------------------**********-------------------------------